केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यक्रमांसाठी अनुसुचित जाती प्रवर्गाकरीता (SCSP) SNA SPARSH प्रणालीद्वारे केंद्र हिस्सा ६०% लेखाशिर्ष २२१०G५९२,बाब ३१ अंतर्गत रु.९२७५.०० लक्ष व बाब ३५ अंतर्गत रु.७८२.०० लक्ष व राज्य हिस्सा ४०% लेखाशिर्ष २२१०G६०९, बाब ३१ अंतर्गत रु.६१८३.३३ लक्ष व बाब ३५ अंतर्गत रु.५२१.३३ लक्ष इतका निधी सन २०२६-२७ च्या मूळ अर्थसंकल्पिय तरतूदीमधून वितरीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः बियुडी -१३२६/प्र.क्र.१८८/एनएचएम सं.क्र.१६४०३५२

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १५ जूलै, २०२६

वाचा :-

१) शासन निर्णय समक्रमांक दिनांक २०/०५/२०२६
२) संचालक (वित्त व लेखा) यांचा प्रस्ताव क्र.राआसोम/एफएमजी/४१७९०-७९१/२६-२७, दि. ०१/०७/२०२६
३) संचालक (वित्त व लेखा) यांचा प्रस्ताव क्र.राआसोम/एफएमजी/८५९५७-५८/२६-२७, दि. ०८/०७/२०२६

शासन शुध्दीपत्रक :-

राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमातील केंद्र शासनाने सन २०२६-२७ करिता अर्थसंकल्पीय मंजूर अंदाजपत्रकातील मुळ तरतूदीतून सन २०२६-२७ करिता केद्र शासनाने सामाजिक विशेष घटकाकरिता वितरीत केंद्र हिस्सा ६० टक्के लेखाशिर्ष २२१०G५९२ बाब ३१ (सहायक अनुदाने वेतनेत्तर) अंतर्गत रु.९२७५.०० लक्ष, बाब ३५ (भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान) अंतर्गत रु. ७८२.०० लक्ष व त्यास समरुप राज्य हिस्सा ४० टक्के लेखाशिर्ष २२१०G६०९ बाब ३१ (सहायक अनुदाने वेतनेत्तर) अंतर्गत रु.६१८३.३३ लक्ष, बाब ३५ (भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान) अंतर्गत रु.५२१.३३ लक्ष इतके अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस वितरीत करण्याबाबतचा शासन निर्णय दि.२०/०५/२०२६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये पृष्ठ क्र. ३ व ४ वरील परिच्छेद क्रमांक ७ व ८ मध्ये खालील विवरणपत्रातील स्तंभ ३ मध्ये नमुद केल्यानुसार सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

परिच्छेद क्र.	शासन निर्णय दि.२०/०५/२०२६ मधील तपशील	सुधारणा
१	२	३
०७	सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या/लाभार्थ्याच्या खात्यात थेट जमा होणार आहे.	• सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी योजनेच्या उद्दिष्टांतील लाभार्थ्याच्या खात्यात थेट जमा होणार आहे. • सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यात आरोग्य संबंधित औषधे/वस्तू आणि साहित्य हे सन २०२३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ अंतर्गत दिनांक १७-०३-२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिनियमास अनुसरून महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू व सेवा खरेदी प्राधिकरणा मार्फत खरेदी करावयाची असल्याने योजनेचा निधी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू व सेवा खरेदी प्राधिकरणाच्या बँक खात्यामध्ये वळते करून आरोग्य संबंधित औषधे/वस्तू आणि साहित्य खरेदी करण्यात येईल.
०८	सदर कार्यक्रमाच्या संबंधित लेखाशीर्ष खाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करुन खर्च करण्यात येत असल्याचे त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन निर्णयातील संबंधित असलेल्या सर्व तरतुदीचे/अटी व शर्तीचे पालन करुन त्यासंदर्भात आवश्यक ते प्रमाणपत्र सादर करणे अथवा आवश्यक त्या बाबी स्वतंत्रपणे प्रमाणित करणे राज्य आरोग्य सोसायटीस सदरहू निधी ज्या यंत्रणेमार्फत खर्च करण्यात येणार त्या कार्यक्रम प्रमुखास बंधनकारक राहील.	• सदर कार्यक्रमाच्या संबंधित लेखाशीर्ष खाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी भारतीय रिझर्व्ह बँक द्वारे खर्च करण्यात येतो. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन परिपत्रकातील संबंधित असलेल्या सर्व तरतुदीचे/अटी व शर्तीचे पालन करुन त्यासंदर्भात आवश्यक ते प्रमाणपत्र सादर करणे अथवा आवश्यक त्या बाबी स्वतंत्रपणे प्रमाणित करणे तसेच सदरहू निधी राज्य आरोग्य सोसायटी किंवा ज्या यंत्रणेमार्फत खर्च करण्यात येणार त्या कार्यक्रम प्रमुखास बंधनकारक राहील. • महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. मुंविनि-

परिच्छेद क्र.	शासन निर्णय दि.२०/०५/२०२६ मधील तपशील	सुधारणा
१	२	३
	महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. मुंविनि-२०२२/प्र. क्र. २७/२०२२/विनियम, दिनांक १२.०१.२०२३ मधील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून निधी वितरीत करण्यात येत आहे.	२०२२/प्र.क्र.२७/२०२२/विनियम, दिनांक १२.०१.२०२३ मधील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून निधी वितरीत करण्यात येत आहे.

०२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०७१५११५६१८४९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL VITHALRAO SAWARE

Digitally signed by ANIL VITHALRAO SAWARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=073348B7A8767F0F7865422DF1E65CE2F3BCDF6786E4712E2C088A9AC4FFEE3F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1C7875BFBCCDB94828A5028954F06ED28EC75FD43053DB3AE8254FA5A5D14A57, cn=ANIL VITHALRAO SAWARE
Date: 2026.07.15 15:13:03 +05'30'

(अनिल वि. सावरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई.
५. संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा, पुणे.
६. संचालक, (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
७. अति. संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पूणे
८. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणॆ
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११. वित्त विभाग (अर्थसंकल्प/व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव, (अर्थसंकल्प व लेखा), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (एनएचएम) ...